ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

# शिवसेनेची महाराष्ट्राच्या राजकारणात भूमिका व वाटचाल

*डॉ. अतुल पद्माकर खोसे

*सहाय्यक प्राध्यापक, श्रीमती एच आर पटेल कला महिला महाविद्यालय शिरपूर, जिल्हा धुळे

**सारांश:-**

*एकंदरीत शिवसेनेच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास करीत असताना असे निदर्शनास येते की, महाराष्ट्राच्या राजकारणात विजयाची घोडदोड तसेच कमी अधिक मिळवण्यात शिवसेना यशस्वी झालेली दिसते. मात्र शिवसेनेला 1995 व 2019 ( फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना वर्तमान परिस्थितीत सत्तेत आहे ) चा अपवाद वगळता सत्तेची फळे चागता आलेली नाहीत. त्याचा विविध घटक देखील कारणीभूत ठरलेली दिसत आहेत. त्यात शिवसेनेचे कार्याध्यक्ष म्हणून उद्धव ठाकरे यांनी पक्षाची स्वत:कडे घेतलेली सूत्रे, वारंवार होणारी बंडाळी, पक्षातील हिरवे दावे यासारखे कळीचे प्रश्न निर्माण होत गेल्याने शिवसेनेला प्रगतीचा आलेख उंचावता आला नाही. परंतु तरीदेखील शिवसेनेच्या उदयापासून त्यांनी केलेली कामगिरी खूपच वाचण्या जोगी आहे हे देखील नाकारून चालणार नाही असे दिसते.*

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना:-**

लोकशाही शासन व्यवस्थेत राजकीय पक्ष अनिवार्य असते. राजकीय पक्षाशिवाय लोकशाहीची कल्पनाही सुद्धा केली जाऊ शकत नाही. म्हणून लोकशाहीत राजकीय पक्षांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. राजकीय पक्षांचा सखोल व सविस्तर अभ्यास करण्यापूर्वी राजकीय पक्षांचा उदय व निर्मितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे कारण राजकीय पक्षाची पाळीमुळे आपल्याला पार इतिहासात घेऊन जाते. प्राचीन काळात सत्ते करिता सुरू असलेला संघर्ष, सत्तेची महत्त्वकांक्षा असलेले समाजातील विविध, खुर्चीची अभिलाषा बाळगणारे समाज व्यवस्थेतील काही धुरीनी, तसेच एकाच विचारसरणीचे अनेक गट एकत्र येऊन सत्ता भोगण्याकरिता साधलेली जवळीक यासारख्या विविध गटांनी सत्ता मिळवण्यासाठी चालवलेली रणनीती प्राचीन काळापासून समाजात प्रचलित होती. त्यामुळे अप्रत्यक्षपणे प्रत्यक्षपणे हे गट राजकीय पक्षांची भूमिका पार पाडीत असत. " ग्रीक नगराज्यामध्ये काही गट सत्य करिता अस्तित्वात आले. त्यात प्लेबीन्स आणि पेट्रोलियम्स या गटांची स्वरूप राजकीय पक्ष सारखे होते. असे म्हणणे काही धाडसाचे ठरणार नाही. Party या शब्दाची उत्पत्ती partire या लॅटिन शब्दापासून झाली. या शब्दाचा शाब्दिक अर्थ असे केला जातो की, partire म्हणून भाग या अर्थानेच पक्ष शब्द रूढ

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023

OPEN ACCESS Original Research Article

होत गेला. याच्याच एका संपूर्ण राजकीय वस्तीच्या भागाला राजकीय पक्ष म्हणून ओळखले जाऊ
लागले. "

**शिवसेना पक्षाचा उदय:** भारतातील विविध घटक राज्यांमध्ये प्रादेशिक अस्मिता टिकून राहावीत म्हणून भारतामध्ये असंख्य प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आले. याच प्रादेशिक पक्षाप्रमाणे पुरोगामी महाराष्ट्राची प्रादेशिक अस्मिता जोपासली जावीत, तसेच मराठी माणसाची हिच संबंधाचे रक्षण व्हावेत, म्हणून जी चळवळ सुरू झाली. व त्या चळवळीचे कालांतराने एका राजकीय पक्षात रूपांतर झाले तो प्रादेशिक पक्ष म्हणून शिवसेना या राजकीय पक्षाचा उल्लेख करावा लागतो. " महाराष्ट्रातील मराठी माणसांच्या हक्काकरिता, त्यांच्यातील वाढत्या बेरोजगारीच्या समस्यांची सोडवणूक करण्याकरिता आणि मुंबई ही महाराष्ट्राची आहे हे ठामपणे सांगणारे बाळासाहेब ठाकरे यांनी 19 जून1966 रोजी शिवसेनेची स्थापना मुंबईत केली. शिवसेना ही मराठी माणसाच्या हिच संबंधाशी निगडित असल्याकारणाने महाराष्ट्रातील बहुसंख्य मराठी वर्ग शिवसेनेकडे आकर्षित होऊ लागला. व मराठी माणसाची कवच कुटुंब म्हणून शिवसेना ओळखली जाऊ लागली. शिवसेनेने स्थापना ही राजकीय संघटना म्हणून केली गेली होती. " परंतु या मर्यादित क्षेत्र पुरताच शिवसेनेचे ओळख तिरपात केली असल्याने महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये विस्तार करण्यात मोठ्या मर्यादा येत असल्यामुळे शिवसेनेने राजकीय व्यवस्थेत प्रवेश केला. तू 1968 च्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीदरम्यान. शिवसेनेला सुरुवातीच्या काळात केवळ मुंबई आणि ठाणे या परीक्षेत मध्येच यश मिळत गेले. तसेच महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीमध्ये देखील शिवसेनेचा प्रभाव नगण्य होता. कारण या कालखंडामध्ये शिवसेनेने विविध पक्षाशी साठ गाठ बांधून निवडणुका लढवल्या होत्या. त्यामुळे त्यांना अपेक्षित कामगिरी करता आली नाही.1984 ला संपन्न झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत एकही जागा जिंकण्यात शिवसेनेला यश मिळाले नाही.

"सन 1989 च्या शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही राजकीय पक्षांची युती झाली. त्यामुळे शिवसेनेचा विस्तार होत गेलेला दिसत आहे. सन 1989 मध्ये लोकसभेच्या पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेनेला चार जागा राखण्यात यश मिळाले तर 1990 च्या राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीत शिवसेनेने 52 जागावर विजय मिळवला, यावरून असे निदर्शनास येते की शिवसेनेने मुंबई बाहेरील विभागांमध्ये पक्षाचा मोठा वर्चस्व निर्माण केलेला दिसत आहे. त्यांच्या विस्तारीत स्वरूपामुळे शिवसेनेला इतकी व्यापक यश मिळाले दिसत आहे. मात्र 1991 ला शिवसेनेला राजकीय मंडळीला सामोरे जावे लागले ते म्हणजे छगन भुजबळ यांच्या रूपाने " छगन भुजबळ यांनी शिवसेनेत होत असलेल्या घुसमटीला कंटाळून शिवसेनेचा त्याग केला व आपल्या सोबत शिवसेनेच्या 14 आमदारांना घेऊन काँग्रेसची घरोबा साधला. या राजकीय स्थित्यंतरामुळे शिवसेना खूपच कमकुवत झालेली दिसते. तसेच दरम्यानच्या काळात शिवसेनेचे आक्रमक रूप बघायला मिळाले. त्यामुळे महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यापर्यंत पक्षाचे जाळ बळकट करण्यासाठी प्रयत्न केले गेले. तसेच भाजपची केलेली युतीमुळे सण 1995 च्या राज्य विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेनेचे मत विभाजन टाळली गेली आणि यात राज्याला

सर्वात मोठा पक्ष म्हणून 76 जागा मिळण्यास शिवसेना यशस्वी झाली. त्यामुळे राज्यात पहिल्यांदा बिगर काँग्रेस सरकार स्थायिक झाले. प्रथमच युतीचे सरकार सत्तेत आले. सातत्याने राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीमध्ये आगे कुच करणाऱ्या शिवसेनेला अत्यंत नेतृत्व कामगिरी 1995 च्या विधिमंडळ निवडणुकीत करण्यात यश प्राप्त करतो आले. त्या तात्कालीन कालखंडात शिवसेनेला मोठे खंडार पडले असले तरी तिची पाळीमुळे खोलवर रुजवून व्यापक स्वरूपाचा झालेला विस्तार, आणि महाराष्ट्रातील दीर्घ काळापासून वर्चस्ववादी भूमिका पार पडणाऱ्या राजकीय पक्षांची झालेली पीछेहाटीची लाभ शिवसेनेला मिळाला. परिणामी शिवसेनेची राजकीय आलेख उंचावला गेलेला दिसून येतो.

"सन 1996 लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शिवसेनेला 15 जागा काबीज करण्यात यश मिळाले. त्यामुळे शिवसेना आपले राजकीय अस्तित्व टिकविण्यात यशस्वी झालेली दिसते. मात्र नंतरच्या काळात राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ माजवून राजकीय स्थित्यंतरे घडून आलेत. ती म्हणजे देशातील सर्वात जुना पक्ष काँग्रेसला पुन्हा एकदा राजकीय हादरा बसला. त्यातूनच एका नवीन राजकीय पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात उभा राहिला तो म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस होय. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राची राजकारण पूर्णतः ढवळून निघाले. त्यामुळे या राजकीय पक्षाच्या झंझावतीमुळे सण 1999 ला संपन्न झालेल्या राज्य विधिमंडळ निवडणुकीत शिवसेनेला अपेक्षित कामगिरी साध्य करता आली व केवळ 69 जागा जिंकण्यात यश मिळाले " परिणामी सत्तेतून पायउतार व्हावे लागले. भाजप व शिवसेनेला विरोधी पक्षाची भूमिका पार पाडावी लागली. या ठिकाणी असे निदर्शनास येते की, शिवसेनेची खूप मोठी घसरण झालेली दिसते. तसेच आपले राजकीय अस्तित्व टिकून ठेवण्यात शिवसेना अपुरी पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उदयामुळे शिवसेना बहुसंख्य मतदारांची विभाजन झालेले दिसून येते. सन 2004 च्या लोकसभा निवडणुकीत 12 जागा विजय मिळवून आपला प्रगतीचा आले काही अंशी समतोल ठेवण्याचा प्रयत्न शिवसेनेकडून झालेला दिसतो. यानंतरच्या काळात शिवसेनेची अंतर्गत गटबाजी चांगली चव्हाट्यावर आली व त्यातून विधानसभेचे तात्कालीन विरोधी पक्ष नेते नारायण राणे व राज ठाकरे यांनी शिवसेनेला सोडचिट्टी दिली. त्यामुळे शिवसेना अधिक खिळखिळी झाली.

2019 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण होऊन महाविकास आघाडीचा जन्म झाला व यातून राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांची युती प्रथमता घडली. यातून शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. परंतु नंतरच्या काळात शिवसेना पक्षांमध्ये मोठी फूट घडून एकनाथ शिंदे हे 40 आमदारासह शिवसेनेतून बाहेर पडले. व त्यांनी शिवसेना पक्षावरती आपला हक्क सांगितला. त्यातून शिवसेना पक्ष चिन्ह व शिवसेना पक्ष हा एकनाथ शिंदे यांच्याकडे गेला. शिवसेनेमध्ये आत्तापर्यंत पडलेली सर्वात मोठी फूट होती.

**संदर्भ:**

1) बंग के.आर. (2019), ' महाराष्ट्र शासन व राजकारण', प्रकाशन विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. क्र. 380

2) कुलकर्णी धवल, अनुवाद- सहस्त्रबुद्धे शिरीष, बोरसे सदानंद (2019), उद्धव राज आणि त्यांच्या सेनांच्या

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XII, Issue– VI (Special Issue-I)* *Nov – Dec, 2023*

OPEN ACCESS Original Research Article

सावल्या ठाकरे विरुद्ध ठाकरे ' प्रकाशन राजहंस प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड पुणे, पृ क्र 114

3) पळशीकर सुहास, (2011) ' महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल ' प्रकाशन समकालीन प्रकाशन पुणे, पृ क्र 130

***Cite This Article:***

Dr. Khose A.P. (2023). **शिवसेनेची महाराष्ट्राच्या राजकारणात भूमिका व वाटचाल**. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 36–39). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10474460